**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर - ४१६ ००४**
Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Rajendranagar, Kolhapur - 416 004

Phones: Chairman 0231-2690829 Secretary 0231- 2691405 FAX : [0231] 2690758
PBX - 0231-2696101, 2696102, 2696103 E-Mail: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/लेखा/टं.वि.फीमाफी/ 721
कोल्हापूर - 416 004
दिनांक - 26/02/2021
1/3/2021

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा सातारा, सांगली व कोल्हापूर

**विषय - सन २०१७-१८ व २०१८-१९ मधील राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करणेबाबत.**

संदर्भ - राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./अंदाजपत्रक/टं.वि.फीमाफी/१७-१८व १८-१९/१०४६ दिनांक २५/०२/२०२१

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सन २०१७-१८ व २०१८-१९ मधील राज्यातील टंचाईग्रस्त भागातील इ.१०वी व इ.१२वी च्या विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती संबंधितांकडून प्रस्ताव मागविण्यात येवून त्या अनुषंगाने धनादेशाद्वारे करण्यात आली आहे. तथापि अद्याप लाभ न दिलेल्या लाभार्थ्यांबाबत परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती ही शासनाच्या निर्देशानुसार राज्यमंडळ स्तरावरून NEFT/RTGS द्वारे विद्यार्थ्यांच्या/पालकांच्या आधार संलग्न खात्यामध्ये वर्ग करण्यात येणार आहे.

सदर परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेसाठी राज्य मंडळाने ऑनलाईनद्वारे बँक खात्याची माहिती मागविणेसाठी संगणकीय प्रोग्राम तयार केला असून मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://mahahsscboard.in अनुक्रमे http://feerefund.mh-ssc.ac.in आणि http://feerefund.mh-hsc.ac.in ह्या लिंकवर मागविण्यात आली आहे.सदर कार्यपध्दतीबाबत तयार करण्यात आलेल्या सूचना यासोबत देण्यात येत आहेत. तरी सर्व माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्याल यांनी दिनांक १५ मार्च २०२१ अखेर ऑनलाईनद्वारे माहिती पाठविण्यात यावी.

(श्री देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव तथा तातडीच्या पुढील कार्यवाहीसाठी,

१. मा.सचिव, राज्य मंडळ, कोल्हापूर
२. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर
३. शिक्षणाधिकारी (माध्य.) सातारा,सांगली व कोल्हापूर

यांना कळविण्यात येते की, तातडीने सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य यांचेशी संपर्क साधून बाधित क्षेत्रातील पात्र लाभार्थींचे बँक खात्याची माहिती ऑनलाईनद्वारे विहित मुदतीमध्ये राज्यमंडळाकडे जमा करण्यात यावी.

# *सन २०१७-१८ मधील राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील इ.१०वी आणि इ.१२वीच्या पात्र तथापि अद्याप परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती न झालेल्या विद्यार्थ्यांना RGTS / NEFT द्वारे परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना*

१. सन २०१७-१८ मधील राज्यातील दुष्काळग्रस्त / टंचाईग्रस्त भागातील इ.१०वी आणि इ.१२वीच्या ज्या पात्र विद्यार्थ्यांना अद्याप परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करण्यात आलेली नाही अशा विद्यार्थ्यांची यादी शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या सांकेतांक क्रमांकानुसार, अनुक्रमे `http://feerefund.mh-ssc.ac.in' आणि 'http://feerefund.mh-hsc.ac.in' ह्या लिंकवर उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर लिंक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://mahahsscboard.in यावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. यादीमध्ये समाविष्ट असलेल्या विद्यार्थ्यांनी त्वरित संबंधित माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांशी संपर्क साधून आधार क्रमांक, आधार संलग्न बँक खाते क्रमांक, Bank IFSC code, MICR code, बँक खातेधारकाचे विद्यार्थ्यांशी असलेले नाते यासंबंधीची माहिति मुख्याध्यापक / प्राचार्य, माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांकडे सादर करावयाची आहे.

३. पात्र असलेल्या आणि अद्याप परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती न झालेल्या सदर विद्यार्थ्याची बँक खात्याची माहिती भरण्यास रकाने उपलब्ध (enable) करण्यात आले आहेत. सन २०१७-१८ मधील अद्याप परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती अप्राप्त असलेल्या लाभार्थ्यांची सर्व माहिती (बँक खाते क्रमांक, Bank IFSC code, MICR code, खातेदाराचे नाव, खातेदाराचा आधार क्रमांक, खातेदाराचे लाभार्थ्याशी नाते इ.) परिपूर्ण / अचूकपणे भरण्यात यावी.

४. सदर यादीमधील विद्यार्थीनिहाय माहिती भरुन submit केल्यानंतर, यादीच्या शेवटी देण्यात आलेले प्रमाणपत्र 'मुख्याध्यापक / प्राचार्य, माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांकडे' यांनी प्रमाणित करुन (√) स्वाक्षरी upload करावयाची आहे. स्वाक्षरी upload केल्यानंतर submit हे बटन उपलब्ध होईल. त्यानुसार बँक खात्याचा तपशील प्राप्त झालेल्या

विद्यार्थ्यांची माहिती निर्धारित दि. १५ मार्च, २०२१ अखेर ऑनलाईन पध्दतीने राज्यमंडळास सादर (submit) करावयाची आहे. सदर माहिती ऑनलाइन पध्दतीने राज्यमंडळाकडे प्राप्त होणार आहे.

५. परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत सर्व अभिलेख (प्रमाणपत्र व Annexure 'A') हे संबंधित माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय यांचे स्तरावर जतन करण्यात यावेत.

६. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'मुख्याध्यापक / प्राचार्य' यांनी सदर यादीमधील विद्यार्थ्यांशी संपर्क साधून सर्व तपशील उपलब्ध करुन घ्यावा.

७. परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती ही राज्यमंडळ स्तरावरुन NEFT / RTGS द्वारे विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येणार असल्याने, सदर माहिती उपलब्ध न झाल्यास सदर लाभापासून विद्यार्थी वंचित राहणार असल्याने परिपूर्ण माहिती निर्धारित कालावधीमध्ये भरण्याची दक्षता घेण्यात यावी.

८. सदर योजना नव्याने कार्यान्वित होत असून या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्याध्यापक / प्राचार्य, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), विभागीय शिक्षण उपसंचालक आणि विभागीय सचिव, विभागीय मंडळ यांनी वैयक्तिक लक्ष घालून विहित कालावधीमध्ये राज्यमंडळाकडे माहिती सादर करणेबाबत पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

९. उपरोक्त सर्व माहिती परिपूर्ण / अचूक भरल्याशिवाय पात्र लाभार्थ्यांना परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम वर्ग केली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

- उपरोक्त अ.क्र.१ ते ९ मधील सूचनांचे वाचन करण्यात आले असून, त्यातील तपशील समजून घेण्यात आलेला आहे.

-----* * * -----

(डॉ. अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे

# *सन २०१८-१९ मधील राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील इ.१०वी आणि इ.१२वीच्या पात्र तथापि अद्याप परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती न झालेल्या विद्यार्थ्यांना RGTS / NEFT द्वारे परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना*

१. सन २०१८-१९ मधील राज्यातील दुष्काळग्रस्त / टंचाईग्रस्त भागातील इ.१०वी आणि इ.१२वीच्या ज्या पात्र विद्यार्थ्यांना अद्याप परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करण्यात आलेली नाही अशा विद्यार्थ्यांची यादी शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या सांकेतांक क्रमांकानुसार, अनुक्रमे `http://feerefund.mh-ssc.ac.in' आणि 'http://feerefund.mh-hsc.ac.in' ह्या लिंकवर उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर लिंक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://mahahsscboard.in प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. यादीमध्ये समाविष्ट असलेल्या विद्यार्थ्यांनी त्वरित संबंधित माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांशी संपर्क साधून आधार क्रमांक, आधार संलग्न बँक खाते क्रमांक, Bank IFSC code, MICR code, बँक खातेधारकाचे विद्यार्थ्याशी असलेले नाते यासंबंधीची माहिती मुख्याध्यापक / प्राचार्य, माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांकडे सादर करावयाची आहे.

३. पात्र असलेल्या आणि अद्याप परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती न झालेल्या सदर विद्यार्थ्यांची बँक खात्याची माहिती भरण्यास रकाने उपलब्ध (enable) करण्यात आले आहेत. सन २०१८-१९ मधील अद्याप परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती अप्राप्त असलेल्या लाभार्थ्यांची सर्व माहिती (बँक खाते क्रमांक, Bank IFSC code, MICR code, खातेदाराचे नाव, खातेदाराचा आधार क्रमांक, खातेदाराचे लाभार्थ्याशी नाते इ.) परिपूर्ण / अचूकपणे भरण्यात यावी.

४. सदर यादीमधील विद्यार्थीनिहाय माहिती भरुन submit केल्यानंतर, यादीच्या शेवटी देण्यात आलेले प्रमाणपत्र 'मुख्याध्यापक / प्राचार्य, माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांकडे' यांनी प्रमाणित करुन (√) स्वाक्षरी upload करावयाची आहे. स्वाक्षरी upload केल्यानंतर submit हे बटन उपलब्ध होईल. त्यानुसार बँक खात्याचा तपशील प्राप्त झालेल्या

विद्यार्थ्यांची माहिती निर्धारित दि. १५ मार्च, २०२१ अखेर ऑनलाईन पध्दतीने राज्यमंडळास सादर (submit) करावयाची आहे. सदर माहिती ऑनलाइन पध्दतीने राज्यमंडळाकडे प्राप्त होणार आहे.

५. परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत सर्व अभिलेख (प्रमाणपत्र व Annexure 'A') हे संबंधित माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय यांचे स्तरावर जतन करण्यात यावेत.

६. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'मुख्याध्यापक / प्राचार्य' यांनी सदर यादीमधील विद्यार्थ्यांशी संपर्क साधून सर्व तपशील उपलब्ध करुन घ्यावा.

७. परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती ही राज्यमंडळ स्तरावरुन NEFT / RTGS द्वारे विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येणार असल्याने, सदर माहिती उपलब्ध न झाल्यास सदर लाभापासून विद्यार्थी वंचित राहणार असल्याने परिपूर्ण माहिती निर्धारित कालावधीमध्ये भरण्याची दक्षता घेण्यात यावी.

८. सदर योजना नव्याने कार्यान्वित होत असून या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्याध्यापक / प्राचार्य, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), विभागीय शिक्षण उपसंचालक आणि विभागीय सचिव, विभागीय मंडळ यांनी वैयक्तिक लक्ष घालून विहित कालावधीमध्ये राज्यमंडळाकडे माहिती सादर करणेबाबत पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

९. उपरोक्त सर्व माहिती परिपूर्ण / अचूक भरल्याशिवाय पात्र लाभार्थ्यांना परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम वर्ग केली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

- उपरोक्त अ.क्र.१ ते ९ मधील सूचनांचे वाचन करण्यात आले असून, त्यातील तपशील समजून घेण्यात आलेला आहे.

-----* * * -----

(डॉ.अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ,पुणे